भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१२-१३/८**
**महापरिपत्रक क्र.०८/२०१२-१३** **जुलै ०२, २०१२**

प्रति,

वर्ग १ असलेल्या सर्व प्राधिकृत डीलर बँका व प्राधिकृत बँका

महोदय / महोदया,

**अनिवासी भारतीय/भारतीय वंशाच्या व्यक्ती/विदेशी नागरिकांसाठी प्रेषण सुविधांवरील महापरिपत्रक**

अनिवासी भारतीय/भारतीय वंशाच्या व्यक्ती/विदेशी नागरिकांसाठी असलेल्या प्रेषण सुविधा, वेळोवेळी सुधारित केलेल्या फेमा अधिसूचना क्र.१३/२०००-आरबी आणि फेमा अधिसूचना.क्र. २१/२०००-आरबी दिनांक मे ३, २००० सह वाचित, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या कलम ६ व्या उपकलम (१) व (२) द्वारा नियंत्रित केल्या जातात.

२. ह्या महापरिपत्रकात, **'अनिवासी भारतीय/भारतीय वंशाच्या व्यक्ती/विदेशी नागरिकांसाठी प्रेषण सुविधा'** ह्या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच जागी एकत्रित करण्यात आल्या आहेत. ह्या महापरिपत्रकात एकत्रित केलेली परिपत्रके/अधिसूचना ह्यांची यादी परिशिष्टात दिली आहे.

३. हे महापरिपत्रक एका वर्षाच्या सनसेट क्लॉजसह देण्यात आले आहे. हे परिपत्रक, जुलै १, २०१३ रोजी मागे घेण्यात येईल आणि त्या जागी ह्या विषयावरील अद्यावत केलेले परिपत्रक दिले जाईल.

आपला,

**(रुद्र नारायण कार)**
**मुख्य महाव्यवस्थापक**

**अनुक्रमणिका**

१. अनिवासी भारतीय(एनआरआय)/भारतीय वंशाच्या व्यक्ती (पीआयओ)/विदेशी नागरिकांसाठी प्रेषण सुविधा....१
२. एनआरआय/पीआयओची व्याख्या ....१
३. चालु उत्पन्नाचे प्रेषण ....१
४. भारतीय वंशाच्या नसलेल्या विदेशी राष्ट्रीयत्वाच्या व्यक्तीद्वारे मालमत्तेचे प्रेषण....२
५. एनआरआय/पीआयओद्वारे मालमत्तेचे प्रेषण....२
६. वेतनाचे प्रेषण ....४
७. एनआरआय/पीआयओनी विदेशी मुद्रेमधून घेतलेल्या निकासी मालमत्तेच्या विक्रीच्या उत्पन्नाचे प्रत्यावर्तन......४
८. विद्यार्थ्यांसाठी सुविधा....५
९. आयकर क्लिअरन्स....५
१०. आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्ड....६
जोडपत्र - १....७
रिझर्व बँकेला द्यावयाची विवरणपत्रे/अहवाल ....७
जोडपत्र - २....८
प्राधिकृत डीलर बँकांसाठी कार्यकारी सूचना....८-९
परिशिष्ट....११
महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या अधिसूचना/परिपत्रकाची यादी....१२

**१. अनिवासी भारतीय(एनआरआय)/भारतीय वंशाच्या व्यक्ती(पीआयओ)/विदेशी नागरिकांसाठी प्रेषण सुविधा**

एखादी व्यक्ती भारतामधील रहिवासी असो अथवा नसो - तिच्याद्वारे भारताबाहेर ॲसेट्स हस्तांतरित करण्याचे विनियम, अधिसूचना क्र. फेमा १३/२००० आरबी आणि फेमा २१ २००० आरबी. दि. मे ३, २००० आणि व्यक्तीने भारतात धारण केलेल्या मालमत्तेच्या विक्रीची रक्कम, ती व्यक्ती भारताची किंवा भारताबाहेर रहिवासी असली तरीही, भारताबाहेर पाठविण्यास, फेमा किंवा त्याखाली असलेले नियम विनियम सोडल्यास, रिझर्व बँकेची पूर्व मंजुरी आवश्यक आहे.

**२. एनआरआय/पीआयओची व्याख्या**

ह्या उद्देशाने, एनआरआय म्हणजे, भारताचा नागरिक असलेली परंतु भारताबाहेर रहिवासी असलेली व्यक्ती फेमा अधिसूचना क्र १३ दि मे ३, २०००च्या विनियम २ अनुसार, अनिवासी भारतीय (एनआरआय) म्हणजे, भारताचा नागरिक असलेली परंतु भारताबाहेर रहिवासी असलेली व्यक्ती भारतीय वंशाची व्यक्ती (पीआयओ) म्हणजे, बांग्लादेश किंवा पाकिस्तान सोडून अन्य कोणत्याही देशातील नागरिक व्यक्ती, (अ) जिने कोणत्याही वेळी भारतीय पासपोर्ट धारण केला होता. किंवा (ब) ती व्यक्ती किंवा तिचे आई किंवा वडील किं तिचे आजी/आजोबा, भारतीय घटनेनुसार किंवा नागरिकत्व अधिनियम १९५५ अनुसार भारताचे नागरिक होते. किंवा (क) ती व्यक्ती एखाद्या भारतीय नागरिकाची किंवा (अ) किंवा (ब) मधील संदर्भित व्यक्तीची पत्नी किंवा पती असल्यास.

**३. चालु उत्पन्नाचे प्रेषण**

३.१ खातेधारकाच्या भाडे, लाभांश, पेन्शन, व्याज ह्यासारख्या भारतातील उत्पन्नाचे प्रेषण त्याच्या एनआरओ खात्यात डेबिट करण्यास परवानगी आहे. भारतामध्ये **एनआरओ खाते नसलेल्या** एनआरआय व्यक्तींच्या भाडे, लाभांश, पेन्शन, व्याज इत्यादि चालु उत्पन्नाचे प्रत्यावर्तन करण्यास प्राधिकृत डीलर बँका परवानगी देऊ शकतात. मात्र त्यासाठी, प्रत्यावर्तित करावयाची रक्कम प्रेषण करण्यास पात्र असून, लागु असलेले कर देण्यात आले आहेत/तशी तरतुद केली आहे, असे सुयोग्य प्रमाणपत्र, चार्टर्ड अकाउटंट द्वारा सोबत दिले जावे.

३.२ एनआरआय/पीआयओंना, त्यांचे चालो उत्पन्न, त्यांच्या अनिवासी (बाह्य) रुपये खात्यात जमा करण्याचा पर्याय उपलब्ध आहे मात्र त्यासाठी, असे क्रेडिट म्हणजे त्या अनिवासी खातेदाराचे चालु उत्पन्न असून त्यावरील आयकर भरण्यात आला आहे/त्याची तरतुद केली आहे ह्याबाबत प्राधिकृत डीलर बँकेचे समाधान झाले असले पाहिजे.

३.३ नोकरी करण्यासाठी भारतात आलेले व फेमा १९९९ च्या कलम २(५) अनुसार नागरिक झालेले विदेशी नागरिकही रहिवासी बचत खाते उघडू/ठेवू शकतात. व ते त्यांच्या रहिवासी खात्याचे नाव एनआरओ खाते असे करण्यास पात्र आहेत - कारण त्यांना नोकरी सोडल्यावर हा देश सोडून गेल्यावर त्यांनी न्याय्य थकबाकी, काही विशिष्ट अटींवर त्यात जमा

करण्यास मदत होईल.

**४. भारतीय वंशाच्या नसलेल्या विदेशी राष्ट्रीयत्वाच्या व्यक्तीद्वारे मालमत्तेचे प्रेषण**

४.१ भारतामधील नोकरीमधून सेवानिवृत झालेली किंवा भारतात रहिवासी असलेल्या व्यक्तीकडून मालमत्ता वारशाने मिळवलेली व्यक्ती किंवा भारतात रहिवासी असलेल्या भारतीय नागरिकाची विधवा अशी विदेशी राष्ट्रीयत्वाची व्यक्ती, प्राधिकृत डीलर बँकेचे समाधान झाले असल्यास आणि ती मालमत्ता मिळविण्या/वारशाने मिळाली असल्याबाबत कागदोपत्री पुरावा सादर केल्यास किंवा त्या प्रेषणकार व्यक्तीने तसे प्रेषणापत्र दिल्यास आणि सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसने त्यांचे परिपत्रक क्र. १०/२००२ दि. ऑक्टोंबर ९, २००२ अन्वये विहित केलेल्या नमुन्यात चार्टर्ड अकाउंटंटचे प्रमाणपत्र सादर केल्यास, प्रति आर्थिक वर्स्हासाठी (एप्रिल-मार्च) एक दशलक्ष डॉलर्सपेक्षा अधिक नसलेल्या रकमेचे प्रेषण करु शकते.

४.२ ह्या प्रेषणसुविधा नेपाळ व भूतानच्या नागरिकांसाठी उपलब्ध नाहीत.

४.३ जेव्हा भारतात रहिवासी असलेली व्यक्ती, एखाद्या भारताबाहेरील देशात(नेपाळ वभूतान सोडून) नोकरी/उद्योग धंदा/ व्यवसाय ह्यासाठी किंवा भारताबाहेर अनिश्चित काळ राहण्याच्या हेतूने जाते, तेव्हा त्याचे /तिचे विद्यमान खाते एक अनिवासी(सर्वसाधारण)(एनआरओ) खाते समजले जावे. विदेशी राष्ट्रयित्व असलेल्यांना त्यांचे भारताबाहेरील प्रलंबित असलेले येणे गोळा करण्यासाठी विद्यमान सूचनांचे पुनरावलोकन करण्यांत आले आहे. ह्यामुळे, एडी वर्ग-१ बँकांनी, अशा लोकांचे न्याय्य प्रलंबित येणे रक्कमा त्यांना मिळण्यासाठी, अशा व्यक्तींची नोकरी संपल्यावर त्या देश सोडून गेल्यावर, त्यांच्या भारतात ठेवलेल्या खात्याला, एनआरओ खाते असे पुनर्नामकरण करावे. मात्र त्यासाठी पुढील अटी लागु असतील

अ) एडी वर्ग -१ बँकांनी अशा खातेदाराकडून, ते त्या खात्यात किती रक्कम येणे अपेक्षित आहे त्याची सविस्तर माहिती मिळवावी

ब)ती व्यक्ती भारतात रहिवासी असतांना, न्याय्य येणे म्हणून त्याच्या खात्यात जमा होणाऱ्या रकमांबाबत, एडी वर्ग-१ बँकांनी स्वतःचे समाधान करुन घ्यावे

क)अशा एनआरओ खात्यात जमा झालेल्या निधीचे विदेशात ताबडतोब प्रत्यावर्तन केले जावे. मात्र भारतात लागु असलेले आयकर व इतर कर भरले गेले असल्याची खात्री एडी वर्ग-१ बँकांनी करुन घ्यावी

ड) विदेशात प्रत्यावर्तित केलेली रक्कम प्रतिवर्ष युएसडी एक दशलक्षांपेक्षा अधिक नसावी

ई)ह्या खात्यातील डेबिट हे केवळ, खातेदाराच्या विदेशातील खात्यात प्रत्यावर्तन केले जावे

फ)वरील अ) मधील बाबी व्यतिरिक्त खात्यात अन्य कोणतीही जमा केली जाऊ नये

ग)ह्या खात्यांमधील क्रेडिट व डेबिट वर देखरेख ठेवण्यासाठी, एडी वर्ग-१ बँकांनी सुयोग्य अशी अंतर्गत नियंत्रण प्रणाली ठेवावी

ह) वरील अ) मध्ये दिल्याप्रमाणे, खातेदाराने दिलेल्या घोषणापत्रानुसार सर्व येणे जमा होऊन व त्याचे प्रत्यावर्तन केल्यानंतर ते खाते ताबडतोब बंद केले जावे.

**५. एनआरआय/पीआयओद्वारे मालमत्तेचे प्रेषण**

५.१ एखादी अनिवासी भारतीय किंवा भारतीय वंशाची व्यक्ती (पीआयओ), त्याने/तिने ठेवलेल्या अनिवासी रहिवासी (सामान्य) रुपये (एनआयओ) खात्यातून/मालमत्तेच्या (तडजोड किंवा वारशाने मिळालेल्या मालमत्तेसह) विक्रीतून मिळालेल्या उत्पन्नाचे प्राधिकृत डीलर बँकेचे समाधान झाले असल्यास आणि ती मालमत्ता मिळविण्या/वारशाने मिळाली असल्याबाबत कागदोपत्री पुरावा सादर केल्यास किंवा त्या प्रेषणकार व्यक्तीने तसे प्रेषणापत्र दिल्यास आणि सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसने त्यांचे परिपत्रक क्र. १०.२००२ दि. ऑक्टोंबर ९, २००२ अन्वये विहित केलेल्या नमुन्यात चार्टर्ड अकाउंटंटचे प्रमाणपत्र सादर केल्यास, प्रति आर्थिक वर्षासाठी (एप्रिल-मार्च) एक दशलक्ष डॉलर्सपेक्षा अधिक नसलेल्या रकमेचे प्रेषण करु शकते.

५.२ एनआरआय/पीआयओ व्यक्ती, कोणत्याही लॉक-अप कालावधी शिवाय वरील परिच्छेद ५.१ नुसार त्याने त्याच्या रुपये निधीमधून (किंवा भारतात रहिवासीव्यक्ती म्हणून) विकत घेतलेल्या अचल मालमत्तेच्या विक्रीच्या उत्पन्नाचे प्रेषण करु शकते.

५.३ जेथे  लॉक-अप कालावधी नाही अशा, वारशाने किंवा कायदेशीरपणे किंवा तडजोडीने मिळालेल्या मालमत्तेच्या विक्रीतून मिळालेल्या उत्पन्नांच्या प्रेषणांच्या बाबतीत, एनआरआय/पीआयओ. प्राधिकृत डीलर बँकांना, त्या मालमत्ता कायदेशीरपणे किंवा वारशाने मिळाल्याबाबतची कागदपत्री पुरावा, प्रेषणकाराचे प्रेषणापत्र आणि विहित नमुन्यात चार्टर्ड अकाउंटंटचे प्रमाणपत्र सादर करु शकतात. आईवडीलांकडून मिळालेल्या वारशाचा तडजोड हाही एक प्रकार आहे. फक्त त्यातील फरक म्हणजे, तडजोडीखाली असलेली मालमत्ता ही लाभार्थीला आई/वडील मृत झाल्यावरच, कोणत्याही रीतीं शिवाय/अडचणीं शिवाय मिळते व त्यामुळे, प्रोबेट इत्यादींसाठी अर्ज करण्यातील विलंब व असुविधा टळतात. जीवनमानासंबंधीच्या अटीशिवाय, म्हणजे, मालक/आई/वडील ह्यांच्या हयातीत, तडजोड केली गेली असल्यास, असे हस्तांतरण, बक्षीस/देणगी म्हणून केल्यासारखे आहे. ह्यासाठी, तडजोड करणाराच्या जीवनमान-अटीवाचून एनआरआय.पीआयओला ती मालमत्ता मिळाली असल्यास, ती बक्षिस/देणगीच्या रुपाने हस्तांतरित झाली आहे असे समजता येते आणि अशा मालमत्तेच्या प्रेषणसंबंधाने असलेल्या विद्यमान सूचनांनुसार केले जाईल.

५.४ (अ) अचल मालमत्तेच्या विक्रीचे उत्पन्न/ रक्कम ह्यांच्या प्रेषणाची सुविधा पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, चीन, अफगणिस्तान, इराण, नेपाळ व भूतानच्या नागरिकांसाठी उपलब्ध नाही. फेमा, १९९९ च्या कलम ६(५) अनुसार अचल मालमत्ता मिळविलेली व्यक्ती किंवा तिचा वारस, रिझर्व बँकेची पूर्वपरवानगी घेतल्या शिवाय, अशा मालमत्तेच्या विक्रीच्या उत्पन्नाचे प्रत्यावर्तन भारताबाहेर करु शकणार नाही.

ब) इतर वित्तीय ॲसेट्सच्या विक्रीतून आलेल्या उत्पन्नाचे प्रेषण करण्याची सुविधा, पाकिस्तान, बांग्लादेश, नेपाळ व भूतानच्या नागरिकासांठी उपलब्ध नाही.

**६. वेतनाचे प्रेषण**

६.१ विदेशातील राज्याचा भारतात रहिवासी असलेला नागरिक, जो विदेशी कंपनीचा कर्मचारी आहे व त्या कंपनीचे भारतामधील कार्यालय/शाखा/दुय्यम कंपनी/संयुक्त उद्योग ह्यात प्रतिनिधी म्हणून पाठविण्यात आला आहे किंवा भारतामध्ये अभिसंस्थापित झालेल्या कंपनीचा कर्मचारी आहे, तो भारताबाहेरील बँकेत विदेशी मुद्रा खाते उघडू, ठेवू व चालवू शकतो आणि त्याच्या नोकरी निमित्त मिळणारा संपूर्ण पगार तो, अशा खात्यात जमा करुन मिळवू/पाठवू शकतो. मात्र, त्यासाठी, आयकर अधिनियम, १९६१ खाली भारतात मिळणाऱ्या संपूर्ण पगारावर लागु असलेला आयकर भरला असला पाहिजे.

६.२ भारताबाहेरील विदेशी कंपनीने दिलेला भारतीय नागरिक, जो विदेशी कंपनीचा कर्मचारी आहे व त्या कंपनीचे भारतामधील कार्यालय/शाखा/दुय्यम कंपनी/संयुक्त उद्योग ह्यात प्रतिनिधी म्हणून पाठविण्यात आला आहे किंवा भारतामध्ये अभिसंस्थापित झालेल्या कंपनीचा कर्मचारी आहे, तो भारताबाहेरील बँकेत विदेशी मुद्रा खाते उघडू, ठेवू व चालवू शकतो आणि त्याच्या नोकरी निमित्त मिळणारा संपूर्ण पगार तो, अशा खात्यात जमा करुन मिळवू/पाठवू शकतो. मात्र, त्यासाठी, आयकर अधिनियम, १९६१ खाली भारतात मिळणाऱ्या संपूर्ण पगारावर लागु असलेला आयकर भरला असला पाहिजे.

**[वेतनाचे प्रेषण करण्याबाबतच्या वरील तरतुदी, एफईएम (चालु खाते व्यवहार) नियम, २००० च्या शेड्युल ३(७) सह वाचले जावेत.]**

**७. एनआरआय/पीआयओनी विदेशी मुद्रेमधून घेतलेल्या निकासी मालमत्तेच्या विक्रीच्या उत्पन्नाचे प्रत्यावर्तन.**

७.१ एनआरआय/पीआयओंनी खरेदी केलेल्या निवासी मालमत्तेच्या विक्रीच्या उत्पन्नाचे प्रत्यावर्तन, बँकिंग वाहिन्यांमधून मिळालेल्या विदेशी मुद्रेत, ती अचल मालमत्ता मिळविण्यासाठी दिलेल्या रकमेएवढीच सीमित असेल. ही सुविधा फक्त दोन मालमत्तांसाठीच निर्बंधित असेल. उरलेली रक्कम एनआरओ खात्यात जमा केली जावी आणि परिच्छेद ५.१ मध्ये निर्देशित केल्यानुसार एक दशलक्ष डॉलर्सखाली प्रेषित केली जाऊ शकते.

७.२ निवासी/व्यापारी मालमत्तेच्या खरेदीबाबतचे बुकिंग/व्यवहार रद्द झाल्याने, फ्लॅट/प्लॉटचे वाटप न होणे ह्यामुळे, अर्ज शुल्क/अर्नेस्ट मनी/परचेस कन्सिडरेशन ह्यांच्या परताव्याच्या रकमांचे, व्याजासह वर्तन करण्यास प्राधिकृत डीलर बँका परवानगी देऊ शकतात. मात्र त्या बाबतचे मूळ प्रदान हे, त्या खातेदाराच्या एनआरई/एफसीएनआर(बी)/खात्यामधून किंवा नेहमीच्या बँकिंग वाहिन्यांद्वारे भारताबाहेरुन केलेले असावे आणि त्या व्यवहाराच्या खरेपणाबाबत प्राधिकृत डीलर बँकेचे समाधान झालेले असावे. एनआरआय/पीआयओंना तसे वाटल्यास असे निधी त्यांच्या एनआरई/एफसीएनआर(बी) खात्यातही जमा केले जाऊ शकतात.

७.३ एनआरआय/पीआयओंनी, प्राधिकृत डीलर बँका/गृह वित्तसंस्थांकडून कर्ज घेऊन उभ्या केलेल्या निधीमधून विकत

घेतलेल्या निवासी जागांच्या विक्रीच्या उत्पन्नाच्या रकमेचे प्रत्यावर्तन करण्याची परवानगी, प्राधिकृत डीलर बँका देऊ शकतात. मात्र अशा कर्जांची परतफेड त्यांनी नेहमीच्या बँकिंग वाहिन्यांमार्फत विदेशी इनवर्ड रेमिटन्सेसने किंवा त्यांच्या एनआरई/एफसीएनआर(बी)/खात्यात डेबिट करुन केली असली पाहिजे.

**८. विद्यार्थ्यांसाठी सुविधा**

८.१ शिक्षणासाठी विदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अनिवासी भारतीय (एनआरआय) समजले जाईल. आणि ते फेमाखाली एनआरआयना मिळणाऱ्या सर्व सुविधा मिळविण्यास पात्र असतील.

८.२ अनिवासी ह्या नात्याने, ते भारतामधून प्रेषण मिळविन्यास पात्र असतील. (१) स्व-प्रेषणापत्र देऊन भारतातील जवळच्या नातेवाईकांकडून युएसडी १००,००० पर्यंतची रक्कम चरितार्थासाठी- ह्यात त्यांच्या अभ्यासासाठी असलेले प्रेषणही समाविष्ट आहे. (२) भारतामधील प्राधिकृत डीलर बँकेत ठेवलेल्या त्यांच्या एनआरओ खात्यामध्ये, मालमत्तेच्या विक्रीच्या उत्पन्नामधून/शिल्लकेमधून प्रति आर्थिक वर्ष युएसडी १ दशलक्ष पर्यंत (३) उदारीकृत प्रेषण योजनेखाली, प्रति आर्थिक वर्ष, युएसडी, २००,००० पर्यंत.

८.३ फेमाखाली एनआरआयना उपलब्ध असलेल्या सर्व सुविधा विद्यार्थ्यांनाही समानतेने लागु आहेत.

८.४ भारतामधील रहिवासी म्हणून त्यांनी घेतलेली शैक्षणिक कर्जे, फेमा विनियमानुसार पुढेही उपलब्ध होत राहतील.

**९.आयकर क्लिअरन्स**

अशी प्रेषणे, प्राधिकृत डीलर बँकांद्वारे, प्रेषणकाराने घोषणापत्र दिल्यावर आणि सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस, वित्तमंत्रालय, भारत सरकार ह्यांनी त्यांचे परिपत्रक क्र. १०/२००२ दि. ऑक्टोंबर ९, २००२ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात चार्टर्ड अकाउंटंटने प्रमाणपत्रदिल्यावरच, करण्याची परवानगी दिली जाईल. (तुलना करा -ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक) क्र. ५६, दि. नोव्हेंबर २६, २००२.)

**१०. आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्ड**

रिझर्व बँकेची पूर्व मंजुरी घेतल्याशिवायही, एनआरआय/पीआयओंना आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डे देण्याची परवानगी प्राधिकृत डीलर बँकांना देण्यात आली आहे. अशा व्यवहारांची तडजोड, इनवर्ड रेमिटन्स करुन किंवा त्या कार्डधारकाच्या एनआरई/एफसीएनआर(ब)/एनआरओ खात्यातील शिल्लकेमधून केली जावी.

**जोडपत्र - १**

रिझर्व बँकेला द्यावयाची विवरणपत्रे/अहवाल

अनिवासी भारतीय/भारतीय वंशाच्या व्यक्ती/विदेशी राष्ट्रीयत्वाच्या व्यक्तींसाठी असलेल्या प्रेषण सुविधांवरील महापरिपत्रक

| विवरणपत्र | नियतकालिकता | संबंधित सूचनांचा तपशील |
|---|---|---|
| एनआरआय/पीआयओ आणि विदेशी राष्ट्रीयत्वांच्या व्यक्ती - एनआरओ खात्यामधून प्रेषण | उदारीकरण | ए.पी. (डीआयआर मालिका) क्र १२ दिनांक नोव्हेंबर १६, २००६ |

**जोडपत्र - २**

<u>प्राधिकृत डीलर बँकांसाठी कार्यकारी सूचना</u>

**१. सर्वसाधारण**

१.१ प्राधिकृत डीलर बँकांनी, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ (हा अधिनियम) खाली दिल्या गेलेल्या अधिनियम/विनियम/अधिसूचनांच्या तरतुदींच्या काळजीपूर्वक अभ्यास करावा.

१.२ निरनिराळ्या व्यवहारांसाठी प्रेषणाची परवानगी देतेवेळी प्राधिकृत डीलरने पडताळणी करावयाची कागदपत्रे रिझर्व बँके विहित करणार नाही. ह्याबाबत प्राधिकृत बँकांनी ह्या अधिनियमाच्या कलम १० च्या उपकलम (५) चा संदर्भ घ्यावा.

१.३ ह्या अधिनियमाच्या कलम १० च्या उपकलम (५) मधील तरतुदींनुसार, कोणत्याही व्यक्तीच्या वतीने विदेशी मुद्रेतील व्यवहार करतेवेळी, अशा व्यक्तीकडून (अर्जदार) प्राधिकृत डीलर बँकेने घोषणापत्र व अन्य माहिती घेणे आवश्यक आहे. त्यामुळे त्याचे समाधान होईल की, तो व्यवहार ह्या अधिनियमाखाली दिलेल्या तरतुदींचे किंवा ह्या अधिनियमाखाली तयार केलेले कोणतेही नियम किंवा विनियम किंवा त्याखाली दिलेले निदेश किंवा आदेश ह्यांचे उल्लघन करणारा नाही, असे व्यवहार स्वीकारण्यापूर्वी प्राधिकृत डीलर बँकांनी, अर्जदाराकडून मिळविलेले कागदपत्र/माहिती, रिझर्व बँकेकडून पडताळणी करण्यासाठी जपून ठेवावी.

१.४ ज्याच्या वतीने व्यवहार स्वीकारला जात आहे अशी व्यक्ती, एखाद्या प्राधिकृत डीलर बँकेच्या आवश्यक्तांचे समाधानकारक अनुपालन करण्यास नकार देत असल्यास त्याने तसा व्यवहार करण्याबाबतचा नकार लेखी दिला जावा. अशा नकार दिलेल्या व्यवहारात, ह्या अधिनियमाचे किंवा त्याखाली केलेले नियम किंवा विनियमांचे किंवा त्याखाली दिलेल्या अधिसूचनांचे उल्लंघन करण्याचा हेतु होता असे समजण्यास प्राधिकृत डीलर बँकेकडे कारणे असल्यास ती बँक रिझर्व बँकेला तसे कळवील.

१.५ एकसमान कार्यकृती ठेवण्याच्या विचाराने, प्राधिकृत डीलर बँकांनी, ह्या अधिनियमच्या कलम १० च्या उपकलम (५) च्या तरतुदींचे पालन केल्याची खात्री करण्यासाठी, त्यांच्या शाखांच्या आवश्यक्ता व कागदपत्रे ह्यांचा विचार करावा.

**२. चालु उत्पन्नाचे प्रेषण**

२.१ भाडे, लाभांश, पेन्शन, व्याज इत्यादीसारख्या चालु उत्पन्नाचे भारताबाहेर प्रेषण करणे हे एनआरओ खात्यासाठी परवानगीप्राप्त डेबिट आहे. भारतामध्ये **एनआरओ खाते न ठेवणाऱ्या** एनआरआयना, भाडे, लाभांश, पेन्शन, व्याज इत्यादीसारख्या चालु उत्पन्नाचे भारताबाहेर प्रेषण करण्यास प्राधिकृत डीलर बँका परवानगी देऊ शकतात. मात्र त्यासाठी, प्रेषणासाठी प्रायोजित असलेली रक्कम प्रेषणासाठी पात्र असून, लागु असलेले कर भरण्यात आले आहे/तशी तरतुद केली

आहे असे प्रमाणपत्र चार्टर्ड अकाउंटंटने दिले असावे.

२.२ एनआरआय/पीआयओंना, त्यांचे चालु उत्पन्न त्यांच्या अनिवासी (बाह्य) रुपये खात्यात जमा करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. मात्र, त्यासाठी ती जमा रक्कम, त्या अनिवासी खातेदाराचे चालु उत्पन्न असून त्यावरील आयकर दिला गेला आहे. तशी तरतुद केली आहे ह्याबाबत प्राधिकृत डीलर बँकेचे समाधान झाले असले पाहिजे.

**३. निर्बंध**

(अ) अचल मालमत्तेच्या विक्रीच्या उत्पन्नाबाबत प्रेषण सुविधा, पाकिस्तान बांग्लादेश, नेपाळ व भूतानच्या नागरिकांसाठी उपलब्ध नाही.

ब) इतर वित्तीय ॲसेट्सच्या विक्रीतून आलेल्या उत्पन्नाचे प्रेषण करण्याची सुविधा, पाकिस्तान, बांग्लादेश, नेपाळ व भूतानच्या नागरिकासांठी उपलब्ध नाही.

**४. करभरणीचे पालन**

प्रेषणकर्त्यांने दिलेले प्रेषणापत्र आणि सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस, वित्त मंत्रालय, भारत सरकारने त्यांचे परिपत्रक क्र. १०.२००२ दि. ऑक्टोंबर ९, २००२ मध्ये दिलेल्या (तुलना कराः ए.पी. (डीआयआर मलिका) परिपत्रक क्र ५६ दि. नोव्हेंबर २६,२००२) नमुन्यांमध्ये चार्टर्ड अकाउंटंटने दिलेले दिलेले पमाणपत्र सादर केल्यावरच प्राधिकृत डीलर बँका, अनिवासींना प्रेषण करण्यास परवानगी देऊ शकतात.

**परिशिष्ट**

महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या अधिसूचना/परिपत्रकाची यादी

**http://www.rbi.org.in/Scripts/BS_ApCircularsDisplay.aspx**

**http://www.rbi.org.in/Scripts/Bs_FemaNotifications.aspx**

| अनु. क्र. | अधिसूचना/परिपत्रक क्र. | दिनांक |
|---|---|---|
| १. | अधिसूचना क्र. फेमा ६२/२००२-आरबी | मे १३, २००२ |
| २. | अधिसूचना क्र. फेमा ६५/२००२-आरबी | जुन २९,२००२ |
| ३. | अधिसूचना.क्र. फेमा ९३/२००२-आरबी | जुन २९,२००२ |
| ४. | अधिसूचना क्र. फेमा ९७/२००२-आरबी | जुलै ८, २००३ |
| ५. | अधिसूचना क्र. फेमा ११९/२००२-आरबी | जुन २९,२००२ |
| ६. | अधिसूचना क्र. फेमा १५२/२००७-आरबी | मे १५, २००७ |
| १. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.४५ | मे १३, २००२ |
| २. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र. ४५ | जुलै ८, २००३ |
| ३. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.५ | जुलै १५, २००२ |
| ४. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.१९ | सप्टेंबर १२, २००२ |
| ५. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.२६ | सप्टेंबर २८, २००२ |
| ६. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.२७ | सप्टेंबर २८, २००२ |
| ७. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.३५ | नोव्हेंबर ०१, २००२ |
| ८. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.४० | नोव्हेंबर ५, २००२ |

| | | |
|---|---|---|
| ९. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.४६ | नोव्हेंबर १२, २००२ |
| १०. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.५६ | नोव्हेंबर २६, २००२ |
| ११. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.५९ | डिसेंबर ९, २००२ |
| १२. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.६७ | जानेवारी १३, २००३ |
| १३. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.१०१ | मे ५, २००३ |

| | | |
|---|---|---|
| १४. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.१०४ | मे ३१, २००३ |
| १५. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.४३ | डिसेंबर ८, २००३ |
| १६. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.४५ | डिसेंबर ८, २००३ |
| १७. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.६२ | जानेवारी ३१, २००४ |
| १८. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.४३ | मे १३,२००५ |
| १९. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.१२ | नोव्हेंबर १६, २००६ |
| २० | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.२६ | जानेवारी १४, २०१० |
| २१. | ए.पी. (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.७० | जुन ०९, २०११ |

**सूचना**

**• प्राधिकृत डीलर बँकांच्या सोयीसाठी, रिझर्व बँकेला सादर करावयाच्या विवरणपत्रांचे / अहवालाचे कोष्टक, तसेच कार्यकारी मार्गदर्शक तत्वे अनुक्रमे, जोडपत्र १ व २ मध्ये दिली आहेत.**

**• येथे माहितीसाठी स्पष्ट करण्यात येते की हे महापरिपत्रक परिपूर्ण असेलच असे नाही. आणि अधिक माहिती/स्पष्टीकरण पाहिजे असल्यास, संबंधित ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रकाचा संदर्भ घेणे आवश्यक आहे.**